International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# भारतीय शास्त्रीय संगीतातील ध्रुपद गीतप्रकार

**प्रा. वंदना मा. इंगोले**
*श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ.*
*Corresponding Author – प्रा. वंदना मा. इंगोले*
**DOI - 10.5281/zenodo.15251021**

**प्रस्तावना:**

संगीत ही अशी एक आकर्षक कला आहे जी अनादी काळापासून आकर्षणाचा केंद्र बिंदू राहीली आहे. प्रकृतिच्या कणा कणात, संगीत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात व्याप्त आहे. मानव जीवनाचा विकास ज्याप्रमाणे होत गेला त्याचप्रमाणे संगीताचाही विकास होत गेला. शास्त्राच्या अनुसार ललीत कला 64 मानल्या गेल्या आहेत. त्या कलांमध्ये संगीत सर्वाधिक श्रेष्ठ, लोकप्रीय, मान्यता प्राप्त आणि हृदयावर सरळ परिणाम करणारी, मानवी भावना पोहचविण्याच प्रभावी माध्यम संगीत आहे. भारतीय परंपरानुसार संगीताचा संबंध वेद काळापासून मानला जातो. धर्म अध्यात्म आणि साधना त्यांच्या सहवासातच संगीताचा जन्म झाला आहे. मंदिर आणि राजाश्रय हे संगीत कलेच्या आश्रयाचे स्थान राहीले आहे. वैदिक संगीत आणि गांधर्व संगीत हे दोन्ही प्रकार ह्याच वातावरणात भरभराटीस आले, विकसित पावले अजरामर झाले. देव-देवतांच्या पुजा अर्चना, स्तुती गानने संगीताचा प्रारंभ झाला. याचं शुध्द स्वरूपात गायील्या गेलेल्या शास्त्रीय संगीताला मार्गी संगीत मानले गेले. मार्गी संगीतानेही अशाच वातावरणात उन्नती केलेली आहे. दुसरे देशी किंवा जे लोक परंपरेतून आले ते लोकसंगीत होय.

**संगीत शास्त्र:**

भारतीय शास्त्रीय संगीताला व्यापक आणि विस्तृत अशी परंपरा लाभली आहे. संगीत तज्ञ, गुणी कलावंत शास्त्रीय संगीताला पक्का गाना असे म्हणत. जे निबध्द आहे, ज्याला स्वर आणि ताल नियमाच्या चौकटीचे बंधन आहे. ज्याचे ज्ञान संपादन करणे आणि प्रयोग करणे दोन्हीही कठीण आहे. असे हे शास्त्रीय संगीत सर्वसाधारण जनमाणसाला समजणे तसे कठीणचं आहे. इतिहासाचा मागोवा घेतल्याशिवाय संगीताचे शास्त्र समजणे अवघड आहे.

**संगीताचा विकास:**

भारतीय शास्त्रीय संगीताच्या विकासाच्या दृष्टिने असे म्हणता येईल की, मंदिर आणि राजदरबारी महत्वाचे आश्रय असे ठिकाणचं संगीताच्या विकासाचे मुख्य केंद्र मानल्या गेले आहे. राजे-महाराजे हे संगीतातील कलावंताच्या उपजीविकेचे सर्व साधन उपलब्ध्द करून देत असत. त्यांना राहण्याची सोय जमीन, धन, पुरस्कार अशा अनेक प्रकारच्या सोई उपलब्ध्द करून देऊन कलावंतांना आश्रय देत असत. त्यामुळे बहुतांश कलावंतांना आपली कला विकसित करण्यास चालना मिळाली.

भारतीय संगीताच्या दोन प्रमुख विशेषता राग आणि ताल आहे. यामध्ये राग निबध्द आणि अनिबध्द (संपूर्ण राग विस्तार) दोन्ही पध्दतीने सादर केला जातो. तरीही निबध्द गानला विशेष महत्व आहे. कुणीही

संगीततज्ञ असो संगीत सिध्दांताचा, नियमाचा परित्याग करू शकत नाही. हिंदुस्थानी संगीताची सैध्दांतिक मर्यादा आणि त्याची नियमबध्दता हे दोन गुण त्याची ओळख आहे, जे अनिवार्य आहेत. काही कलावंताचे आपली कला ईश्वर चरणी अर्पण करून ईश्वर उपासना करणे हेच ध्येय राहीले मंदिरामध्ये राहून परमेश्वरालाच स्मरूण आपली कला ईश्वर चरणी अर्पण व्हावी म्हणून ह्या हेतूने संगीत समारोहाचे कार्यक्रम देखील मंदिर परिसरातच लोकांना निमंत्रित करून सादर केले जात असत.ही संगीत प्रचार-प्रसाराच्या दृष्टिने. केलेली वाटचाल होय.

आधुनिक काळात भारतामध्ये शास्त्रीय संगीताच्या दोन पध्दती प्रचलित आहेत. एक उत्तर हिंदुस्थानी संगीत पध्दती आणि दुसरी दक्षिणी म्हणजे कर्नाटकी संगीत पध्दती होय. आधुनिक काळात हिंदुस्थानी संगीत पध्दतीचे क्षेत्र उत्तर भारतापुरतेच मर्यादीत न राहता संपूर्ण भारतवर्षमध्ये विस्तारले गेले आहे. या दोन्हींमध्ये कर्नाटकी संगीत पध्दतीला प्राचिन मानले गेले आहे. आधुनिक शब्दाचा प्रयोग जेंव्हा केला जातो तेंव्हा या संगीताला अकबराच्या काळापासून तर वर्तमान काळापर्यंत बघीतले जाते. अकबराच्या काळापासून प्रचलित असलेली ध्रुपद परंपरापासून तर आजपर्यंतचे संगीत हे आधुनिक संगीतच होय.

**मुस्लिम शासक काळः**

मुस्लिम शासक संगीत कला प्रेमी होते. अकबर हे मुस्लिम वंशाचे होते त्यांचे विचार महान होते अकबर एक शांतप्रीय सम्राट होते. ते संगीताला पवित्र पुज्य आणि साधनेला कला मानत होते. त्याच्या काळात भारतीय संगीताची जी पवित्रता, निर्मलता होती ती स्थिर होती. अकबराच्या महम्ते विषयी एका अरबी विद्वानाच्या मते. **अकबर के काल मे भारतीय संगीत अपने पूर्ण यौवन पर था/** ध्रुपद गायन शैलीला त्यांनी पुन्हा प्रोत्साहन दिले. दरबारी संगीताचा खरा विकास अकबराच्या काळात झाला. अकबर तानसेनला आपला गुरू म्हणून स्विकारतो व तानसेन यांना नवरत्न उपाधीने सन्मानीत करतो. तानसेन हे धृपद गायक होते. त्यावेळी ध्रुपदाच्या 4 बाणी प्रचलित होत्या. बाणी म्हणजे शैली या शब्दाचा प्रयोग सोळाव्या शतकात रचल्या गेलेल्या ध्रुपदामध्ये मिळते. सर्वप्रथम संगीतामध्ये गीती विषयी चर्चा मिळते. ग्वाल्हेरचे तोमर वंशाचे शासक मानसिंह तोमर यांच्या शासन काळात गीती चे स्थान बानी (शैली) ने घेतले. या बाणीची चर्चा तानसेनने आपल्या एका ध्रुपदात केली आहे.

बानी चारौं के त्यौंहार सुनि लीजै हो गुणीजन
तब पावें यह विद्या सार
राजा गुबरहार,फौजदार, खण्डहार ,दीवान डागुर, बकसी नौहार
अचल सुर पंचम, चल सुर ऋषभ
मध्यम धैवत निषाद गंधार
सप्त तीन, इकईस मूर्च्छना, बाईस श्रुति सुरति
उनचाय कूट ताने तानसेन आधार।

वरील ध्रुपदामध्ये चार वाणीचे वर्णन करतांना अचल स्वर पंचम,चल स्वर रिषभ,मध्यम,धैवत गंधार असून तिन्ही सप्तक, एकविस मुच्छर्ना बावीस श्रुति आणि कुटतानेचा उल्लेख केलेला आहे वाणीच्या पुर्वी भरतमत, शिवमत, हनुमंत मत आणि नारद मत प्रचलित होते. गोबरहार बाणीसोबत तानसेन यांचे नाव जोडले जाते. डॅा. हरिकिशन गोस्वामी यांचे मते, खरे पाहीले तर ही ग्वाल्हेरी शैली आहे. गो पालन करणारं एक क्षेत्र आहे. ग्वालांचा देश असल्या कारणाने ग्वाल्हेर नावाने प्रसिध्द झाला. गोबरहार बाणी मध्ये आस आणि मिंडची प्रधानता आहे. आवाजाचा अटूट क्रम, ही शैली सरळ, सीधी आणि विलंबित लयीमध्ये असल्यामूळे शांत, श्रृंगार, करूण तसेच वीर रसप्रधान आहे. अनेक प्रचलित, अप्रचलित तालांमध्ये निबध्द आहेत. अकबराचा शासन काळ संगीतातील सुवर्ण युग म्हणून ओळखल्या जातो. अकबराच्या दरबारात 36 संगीततज्ञ असल्याचा उल्लेख ग्रंथामध्ये मिळतो. ज्याप्रमाणे अकबराच्या दरबारातील 9वे रत्न म्हणून तानसेन यांचे नाव घेतले जाते तसेच बैजू बावरा यांचेही नाव मोठ्या

सन्ममानाने घेतले जाते. राजा मानसिंह तोमर यांच्या दरबारात अनेक संगीततज्ञ होते. बैजू बावरा हेही त्यांचे समकालीन आहेत. असे म्हटले जाते की, बैजू यांच्याच सहयोगाने राजा मानसिंह तोमर यांनी ध्रुपद परिष्कार करून ध्रुपद प्रचार प्रसार केला. मानसिंह तोमर यांच्या पत्नी मृगनयनी यांना बैजूने संगीत शिक्षा दिली. मुघल राजांनी ध्रुपद गानशैलीला मान्यता दिली. ज्यामुळे या शैलीला समाजात प्रतिष्ठा मिळाली. ध्रुपद गायकाला त्यावेळी कलावंत म्हटले जात असे. याच वेळी ख्याल गायन शैली सुध्दा प्रचारात येत होती. ध्रुपद शैलीचा मुस्लिम राजांनी आपल्या दरबारात उत्तर हिंदुस्थानी संगीताचा प्रचार प्रसार केला यातच तानसेन परंपरा पुढे आली. त्यानंतर बादशहा मुहम्मदशाह रंगीले यांनी सुध्दा संगीताच्या विकासाकरीता मोठे कार्य केले.

उत्तर भारतातील सर्वात मोठे संगीत सम्मेलनाचे आयोजन जौनपुरचे राजे सुलतान हुसेन शर्की यांनी केले होते. त्यात त्यांनी प्रसिध्द विद्वान ध्रुपद, धमार कव्वाल अशा प्रसिध्द कलावंतांना निमंत्रित केले जात होते. आणि त्याच संगीत संम्मेलनामध्ये त्यांनी जे राग निर्माण केले होते ते राग जौनपुरी तोडी आणि हुसेनी कानडा ह्या रागांना त्यांनी स्विकृती दिली.

16 व्या शतकापुर्वी आपल्या देशात संगीताचे स्वरूप धार्मिक होते. हेच धार्मिक स्वरूप आपल्या देशात धुरपद गायनाच्या रूपात प्रफुल्लीत झाले. कालांतराने 17 व्या 18व्या शताब्दीत जेंव्हा संगीताचे रूप श्रृंगार रसाकडे वळले आणि ख्याल गीतप्रकार उदयास आला.

हिंदुस्थानी संगीताच्या रागांचे अस्तित्व स्वरांवर अवलंबून आहे. आधुनिक संगीतातील राग दहा थाटांमध्ये विभाजीत केले आहे. हिंदुस्थानी संगीतातील 7 शुध्द स्वर,4 कोमल आणि 1 विकृत स्वर अशा 12 स्वरांची स्थापना 22 श्रृतिंवर केली आहे. श्रुतींच्या आधारे तिन्ही मध्य, मंद्र आणि तार सप्तकाची स्थापना केली गेली आहे. हे केवळ कुशल गायक ज्यांनी वर्षानुवर्ष साधना केली तेच गायक तिन्ही सप्तकामध्ये गायन करू शकतात. या स्वरांना विशेष अर्थ आहे. प्रत्येक स्वरामधून वेगवेगळे भाव उत्पन्न होतात. कोणत्याही रागाचे स्वर त्या त्या रागातील भावात्मक वातावरण निर्माण करतात. हे केवळ संगीत साधक जाणतो. त्याचा ऐकणा-याच्या मनावर परिणाम होतो. स्वरांमधून भाव रस निर्माण करणे गायकाच्या कुशलतेवर अवलंबून असते. शुध्द,कोमल-विकृत स्वर ,वादी-संवादी विवादी-अनुवादी वर्ज्य स्वर, ग्रह, अंश, न्यास,औडव ,षाडव आणि संपूर्ण जाती, कण स्वर,मिंड,गमक,लयकारी इत्यादी विषयी शास्त्रीय संगीताच्या जगतात प्रवेश करणा-याला समजून ध्यावे लागते. सैध्दांतिक पध्दतीचे कितीही ज्ञान संपादन केले असले तरी स्वर कसे लावावे. कोणत्या रागातील स्वर कसे लावण्याने त्या रागातील भाव, सौंदर्य खुलते याचे ज्ञान केवळ गुरू मुखातूनच साध्य करावे लागते. तसाही संगीताचा भाषा प्रांत हा वेगळाच. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत काय आहे.? हे गुरूच्या रूबरू, सानिध्यात राहूनच समजून शकते. म्हणूनच संगीताची शिक्षा ग्रहण करतांना स्वरांचे शास्त्र (प्रात्यक्षिक) समजण्याकरीता गुरूचे स्थान सुध्दा तितकेच महत्वाचे आहे. गुरू-शिष्य परंपरेला संगीतामध्ये विशेष महत्व आहे.

**घराणा परंपरा:**

विद्वानाच्या मते, 8 वी ते 12 शतकामध्ये घराणा परंपरेला सुरूवात झाली. अभिजात शास्त्रीय संगीताचे स्वरूप बघता संगीतातील घराणी आणि उस्ताद कलावंताची देण आहे. संगीताचे बदलेले स्वरूप याच परंपरेने प्राचीन संगीत संस्कारांना सुरक्षित ठेवले. गुरू-शिष्य परंपरा ही सुध्दा याच घराण्यातील उस्ताद यांची देण आहे. संगीत जगतात घराणा म्हणजे गुणीवंशाची परंपरा गीताच्या बंदिशी, ध्रुपद अंगाचे ख्याल, आवाज लावण्याची पध्दत, जोरदार किंवा खुली आवाज, रागविस्तार आलापकारी, आलाप करण्याची विशिष्ट पध्दत ज्याला बहलावा असे म्हणत, गमकचा प्रयोग, ताना, सरळ तान, सपाट किंवा जटील तानाचा प्रयोग, अवरोह प्रधान तानांचा सुध्दा प्रयोग

केला जात असे. बोल तानामध्ये लयकारी आणि तालांची निवड हेही वैशिष्ट्य आहे. प्रत्येक घराण्याची स्वतंत्र अशी गान शैली होती. नियम रिती, पध्दती, लालित्य, तारता, स्वरांचा लगाव, कठोर रियाज इत्यादींच्या प्रयोगाने कंठ संस्कार केले जात असे. एकाच रागाचा रियाज वर्षानुवर्ष चालत असे. ही सर्व प्रकिया अर्थातच गुरूच्या मर्जीवर अवलंबून असे.

भारतीय शास्त्रीय संगीतातील ध्रुपद, धमार,ख्याल आणि तराणा मुख्य गान विधा होत. ध्रुपद गान प्रचारात येण्यापुर्वी प्रबंध गानचे प्रचलन होते. ध्रुपदाच्या रचना हिंदी, उर्दू आणि ब्रज भाषेमध्ये मिळतात. ध्रुपद गान प्रारंभ करण्यापुर्वी नोम्,तोम री इत्यांदी बोलांचा प्रयोग करून तिन्ही सप्तकामध्ये आलाप करतात. ध्रुपद विभिन्न लयकारीमध्ये आड लय,बिआड लय, दुगूण,तिगूण चैागुणमध्ये सादर केले जाते. ध्रुपदामध्ये विर, रौद्र ,करूण रस तसेच भक्ति रसाची अभिव्यक्ति दिसून येते. ध्रुपद सादरीकरण करतांना साथसंगतीला मृदंग ह्या ताल वाद्य प्रयोग करतात.

ध्रुपद गायकांमध्ये भारत विख्यात बहरम खा घराण्याचे जाक़िरउद्यीन खॅा, आणि अलाबंदे खॅा महान धुरंधर ध्रुपदीये होवून गेलेत. अलाबंदेचे पुत्र स्वर्गीय नसिरूद्यीन खॅा प्रसिध्द धुरपद गायक होते. नसिरूद्यीनचे सुपुत्र डागर बंधू संगीत जगतात महारथ हासिल केले. वासिफुद्यीन डागर,बन्दे खॅा, उस्ताद अमीमुद्यीन डागर, पं. अभय नारायण मलिक , गुंडेजा बंधू यांचे नाव उल्लेखनीय आहे. ध्रुपद आपल्या संगीताची बहुमुल्य देण आहे आणि ह्या शैलीची रक्षा करणे, त्याला जिवित ठेवणे आपला धर्म आहे.

## निष्कर्ष:

शास्त्राच्या अनुसार ललीत कला 64 मानल्या गेल्या आहेत. त्यामध्ये संगीत सर्वाधिक श्रेष्ठ, लोकप्रीय कला आहे. अटकेपारही हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत तेवढेचं लोकप्रीय आहे. मुगल शासक संगीत कलाप्रेमी तसेच पोशिंदे होते. याच काळात विविध गीतप्रकार उदयास येवून भरभराटीस आले.धुरपद, धमार ,ख्याल आणि तराणा मुख्य गान विधा होत. शास्त्रीय संगीतातील कोणताही गीतप्रकार असो त्याचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. संगीतातील घराण्यांनी ह्या गान विधेची नीव कायम राखली. हिंदुस्थानी संगीताच्या रागांचे अस्तित्व स्वरांवर अवलंबून आहे.

## संदर्भ ग्रंथ:


1. प्रो. स्वतंत्र शर्मा : भारतीय संगीत एक ऐतिहासिक विश्लेषण
2. अशोक दा. रानडे: संगीत विचार
3. डॅा. सुशील कुमार चैबे: हमारा आधुनिक संगीत
4. डॅा. हरीकिशन गोस्वामी: भारतीय संगीत की परंपरा वंशानुक्रम एवं वातावरण
5. डॅा. सुभद्रा चौधरी: भारतीय संगीत में निबध्द
6.